# GREENLAWNS HIGH SCHOOL
## TERMINAL EXAMINATION 2019-20

**SUBJECT : MARATHI** | **CLASS : VIII**
**TIME : 2 HOURS** | **MARKS : 80**

---

सूचना :- १) खालील सर्व प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत सोडलेल्या जागी लिहा.
२) विभाग 'अ' व 'क' उत्तरपत्रिकेसोबत जोडणे.

**विभाग - 'अ'**

**गदय**

प्रश्न १. पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनानूसार कृती करा. (१०)

कृती १ आकलन कृती

i) या गोष्टी करत वरंधा घाटात वेळ कसा जातो कळत नाही ? (२)

| | |
|---|---|
| ______________ ______________ | ______________ ______________ |

त्या पावसाळी वातावरणात भजी-वडे-चहा असा चमचमीत मेनू मजबूत चापायला वरंधा घाटातल्या टपऱ्यांसारखी दुसरी जागा नाही. श्री वाघजाईच्या सोबतीने उभारलेल्या टपऱ्यांमधून हा राजेशाही खाना अगदी ताजा ताजा तयार केला जातो. गरमागरम कांदाभजी आल लसूण घालून तळलेला गरमागरम बटाटेवडा आणि सोबत वाफाळलेला चहा. बाहेर बरसणाऱ्या पावसाकडे पाहत या गरमागरम मेनुचा आस्वाद घेत रानवाऱ्यांच घोंघावण ऐकत, विजेचं लखकन् चमकणं अन कडाडणं मनाच्या हार्ट डिस्कवर स्टोर करत कसा वेळ जातो तेच कळत नाही. बराच वेळ गेल्यावर थोडंस भिजावसं वाटतं, पाय मोकळे करावेसे वाटतात. थोडं डेअरिंग करावंसं वाटतं. जर असं खरंच वाटत असेल, तर इथे अशा जिगरबाज भटक्यांसाठी कावळया किल्ला सज्ज आहे.

कावळया किल्ला तसा बराच मोठा आहे. तो फाडूनच वरंधा घाटाच शेवटचा टप्पा तयार केला आहे. श्री वाघजाई मंदिराच्या बरोबर वरच्या भागात डोंगरमाथ्याजवळ नऊ टाक्यांचा समूह आहे. कोणे एके काळी तो कावळया किल्ल्याचा एक भाग होता. भजी-वडे-चहाच्या टपऱ्यांच्या बाजूने अवघ्या दहा पंधरा मिनिटांतच इथं जाऊन पोहोचता येतं. पाण्याला जीवन का म्हणतात? ते इथं आल्यावर कळत. काळयाशार पाषाणात खोदलेली पाण्याची ती टाकी कित्येक वर्षे कित्येकांची तहान भागवत असतील कोण जाणे. ओल्या वाटेने तरत जाताना अंगावरचे कपडे हमखास रंगतात, कारण पायवाटच तशी रंगिली आहे.

ii) वरंधा घाटातील टपऱ्यांमधून मिळणारा राजेशाही खाना → ______________ (२)
______________

कृती- २

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (२)

i) वरंधा घाटातील टपऱ्या कोणाच्या सोबतीने उभारल्या आहेत?

________________________________________

ii) पायवाटच रंगिली असल्याने काय घडते?

________________________________________

कृती- ३

खालील दिलेल्या इंग्रजी शब्दाचे मराठीतील अर्थ लिहा: (१)

i) १) डिस्क - ____________ २) डेअरिंग - ____________

ii) खालील शब्दातील अक्षरापासून अर्थपूर्ण शब्द तयार करा. (१)

गरमागरम - ______________________________

कृती- ४.

तुमचे स्वमत लिहा. (२)

तुम्ही भेट दिलेल्या एका किल्ल्याची माहिती दया?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## पदय

प्रश्न २. पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनानूसार कृति करा. (८)

कृति १- आकलन कृती (२)


i) कष्टकऱ्यांचे माता-पिता → ____________________

ii) कष्टकऱ्यांची वस्ती → ____________________

आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही।।
श्रमगंगेच्या तीरावरती
कष्टकऱ्यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही।।
इमान आम्हा एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही।।
माणुसकीचे अभंग नाते
अम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही।।

कृती २. आकृती पूर्ण करा. (२)

i) वेगळया नसणाऱ्या गोष्टीच्या जोडया



कृती - ३

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (२)

i) कवीने कष्टकऱ्यांना काय म्हटले आहे ?

ii) कष्टकऱ्यांना कोणते इमान ठाऊक आहे ?

कृती ४
स्वमत
कवितेतील पहिल्या पाच ओळीचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा. (२)

**सूचना :- १) खालील सर्व प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत लिहा.**

**विभाग - 'ब'**

प्रश्न १. अ) रिकाम्या जागी पाठातील योग्य शब्द लिहा. (३)

१. खेळ खेळल्यामुळे आपल्या आयुष्यात ______________ लागते.

२. सर्वांचीच ______________ तयारी होती.

३. कोकणातील निसर्ग पाहत शांत उभे राहून ______________ अनुभवायला हवे.

आ) असे कोण-कोणास म्हणाले ते लिहा. (३)

१. ''काम तरी काय काढलत?''

२. ''अन ती ग कां?''

३. ''ती माझी समय आहे.''

इ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (३)

१) सुट्टीमध्ये नातवंडांनी काय-काय करावे असे लेखकाला वाटते?

२) जिव्हाताईची कामे कोणती आहेत?

३) कवीने वर्णिलेली कवितेची प्रभात कोठे होणार आहे?

प्रश्न २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (९)

१) 'आपण सगळे शरीररुपी राज्याचे सेवक आहोत? ह्या विधानाबाबत तुमचे मत लिहा?

२) तुम्हाला कळलेली कवीची प्रगतीची नवपरिभाषा स्पष्ट करा?

३) तिसऱ्या सहस्त्रकाचे कोणते विशेष लेखकाने सांगितले आहेत?

प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (८)

१) बागेतील एक संध्याकाळ   २) वेळेचे महत्त्व

३) आई संपावर गेली तर   ४) माझा आवडता नेता

प्रश्न ४. खालील दिलेल्या विषयावर पत्रलेखन लिहा.

विदयालयाच्या क्रीडा विभागासाठी क्रीडा साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा. (५)

प्रश्न ५. खालील बातमी वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (५)

शहरवार्ता

मुसळधार पावसामुळे मुंबई ठप्प

मुंबई : मुंबई आणि उपनगरात गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे आज मुंबईची जीवनवाहिनी असलेली रेल्वेसेवा पूर्णपणे कोलमडून गेली आहे. रुळांवर पाणी साचल्यामुळे मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे आणि हार्बर रेल्वे या तिन्ही मार्गांवरील लोकल गाडया नेहमीच्या वेळेपेक्षा दीड ते दोन तास उशिराने धावत आहेत. जनशताब्दी एक्सप्रेस, विशाखापट्टणम एक्सप्रेस अशा लांब पल्ल्याच्या अनेक गाडया रद्द करण्यात

आल्या आहेत. मुंबई आणि परिसरातील शाळा आणि महाविद्यालयांना पुढील दोन दिवस सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी अनुपकुमार गोयल यांनी पाऊस ओसरल्यावर लगेचच रेल्वेसेवा सुरु होईल असे सांगून नागरिकांना दिलासा दिला.

दरम्यान कुर्ला,दादर, परळ, सायन या भागांमध्ये पाणी साचल्याने मुंबईतील रस्ते वाहतूकही खोळंबली आहे. पावसामुळे ठिकठिकाणी अडकून पडलेल्या प्रवाशांना स्थानिक नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येत आहे. सातत्याने कोसळणाऱ्या पावसामुळे शहरातील वीजपुरवठाही खंडित झाल्यामुळे नागरिक हवालदिल झाले आहेत.

प्रश्न:-

१) रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी ?

२) मुंबईमध्ये ठप्प झालेले रेल्वेमार्ग कोणते ?

३) रस्त्यांवर पाणी साचलेल्या ठिकाणांची नावे लिहा ?

४) पावसात अडकून पडलेल्या प्रवाशांना कोणी मदत केली ?

५) रद्द झालेल्या गाडयांची नावे लिहा ?

...६/-

नाव :- ______________________ हजेरी क्रमांक ________

**सूचना – खालील सर्व प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत सोडलेल्या जागी लिहा.**

**विभाग – 'क'**

प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (६)

१) फरफट होणे :- अर्थ - ______________________

वाक्य :- ______________________

२) अद्दल घडणे – अर्थ - ______________________

वाक्य ______________________

३) चेहरा सुकणे – अर्थ - ______________________

वाक्य - ______________________

४) आस्वाद घेणे – अर्थ - ______________________

वाक्य - ______________________

प्रश्न २. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा. (३)

राधाचा वर्गात प्रथम क्रमांक आल्याने तिला गुरुजीने बक्षिस दिले.

______________________

______________________

प्रश्न ३. खालील वाक्यातील अव्यय ओळखून त्यांचे प्रकार लिहा. (४)

१. सर्व मुले मंडपाजवळ गोळा झाली- ______________________

२. रीमा घरी आली पण ती रागातच होती.- ______________________

३. आईने फार घाईघाईने काम आवरले. - ______________________

४. छे!छे! हे काम मी मुळीच करणार नाही- ______________________

प्रश्न ४. क ) खालील वाक्यातील अधोरेखांकित शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (२)

१. गडाचे काही अवशेष बाकी होते.

______________________

२. जंगलात पक्षी स्वैरपणे विहार करत होते.

______________________

ख) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (२)

१) कौटुंबिक x ______ २) सेवक x ______

३) वयस्कर x ______ ४) सतत x ______

ग) खालील वाक्यातील अधोरेखांकित शब्दांचे वचन बदला. (२)

१) मैदानात पताका लावल्या होत्या.

______

२) घराचा चौथरा बांधून झाला होता.

______

घ) खालील वाक्यातील लिंग बदला. (२)

१) नर - ______ २) कावळे - ______

३) सहाय्यक - ______ ४) दिवटा - ______

प्रश्न ५. खालील वाक्यांचे प्रकार ओळखा. (३)

१) "बाबा घरी येतील तेव्हा त्यांना तुझा निरोप देईन"

______

२) वाळवी घराचे नुकसान करते.

______

३) मी गावी गेली आणि अचानक पाऊस सुरु झाला.

प्रश्न ६. खालील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हे वापरुन वाक्ये पुन्हा लिहा. (२)

१) बसा मंडळी पोटोबा प्रधान आले की नाही अजून

______

२) काय ग नासिके तुला काय वाटतं

______